# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०३/०९/२०२४ (मंगळवार) सायंकाळ**

---

## अवैध दारूची तस्करी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

दिनांक ०२/०९/२०२४ रोजी पोस्टे अरोली येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, सिरसोली येथील चंद्रकुमार टेकचंद कुनभरे हा आपले घरासमोरील हिरव्या रंगाचे मॅटचे शेडमध्ये दारू विक्री करीत आहे. अशा माहिती वरून स्टाफ यांनी आरोपीचे घराची घरझडती घेतली असता त्याच्या घरासमोरील हिरव्या रंगाचे मॅटचे शेडमध्ये कापडी थैलीत विदेशी दारू १) कि. १६५०/— रू. ११ नग, १८० मिली भरलेली काचेच्या शिशित ओ. सी. ब्ल्यु विदेशी दारू. प्रतीनग १५० रू. प्रमाणे २) कि. ८०/— रू. १ नग, ९० मिली भरलेली प्लास्टीक शिशित ओ.सी.ब्ल्यु. विदेशी दारू. प्रतीनग ८० रू. प्रमाणे ३) १८०/— रू. ०१ नग ROYAL STAGE DELUXE WHISKY विदेशी दारू प्रत्येकी १८० मिलीने भरलेली काचेची शिशित एक नग १८० रू. प्रमाणे ४) कि. २००/—रू. ०२ नग ROYAL STAGE DELUXE WHISKY विदेशी दारू प्रत्येकी ९० मिलीने भरलेली काचेची शिशित एक नग १००रू. प्रमाणे ५) कि. १५०/— रू. ०१ नग McDowells No १ विदेशी दारू प्रत्येकी १८० मिलीने भरलेली काचेची शिशित प्रति नग १५०रू. प्रमाणे वरील प्रमाणे असा एकुण २२६०/— रू. विदेशी दारू मिळुण आला.

तसेच त्याचे घरासमोरील हिरव्या रंगाचे मॅटचे शेडसमोर उभी असलेल्या आरोपी चंद्रकुमार टेकचंद कुनभरे याची बजाज कंपनीची काळया रंगाची प्लॅटीना मोसा क्र. एम एच—४०/सि.आर—४३९६ ची पाहणी केली असता सदर गाडीच्या डीक्कीमध्ये ०२ नग १८० रू. प्रमाणे एकुण किंमती ३६०/—रू. असा एकुण ६२,६२०/— रू. चा मुद्देमाल जप्त केला. आरोपीविरूद्ध पोस्टे अरोली येथे कलम ६५(ई) मदाका प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे अरोली येथील ठाणेदार सपोनि स्नेहल राउत, पोउपनि सुशिलकुमार सोनवाने, पोहवा संदीप बाजनघाटे, पोअं. सचिन मुदगर यांनी पार पाडली.

# अवैध दारूची तस्करी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

दिनांक ०२/०९/२०२४ रोजी पोळा या सणा निमित्ताने पोलीस स्टेशन उमरेड हद्दीत अवैध दारु विक्री करणारे लोकांविरुध्द मोहिम राबवुन वेगवेगळया ०९ इसमांवर कारवाई करण्यात आली. यामध्ये **आरोपी नामे— १) आशिष अंकुश गेडाम वय ३८ वर्ष रा. जोगीठानापेठ उमरेड २) शकिल सुलतान शेख वय ४७ वर्ष रा जोगीठापेठ उमरेड ३) चिंतामन कंठीराम भुसारी वय ५८ वर्ष रा बुधवारीपेठ उमरेड ४) उमेश गुलाब कपाटे वय ३८ वर्ष रा सोमेश्वर महाराज मढ ईतवारपेठ उमरेड ५) रामा काशीराम सेलोकर वय ४६ वर्षे रा. त्रिमुर्ती नगर बुधवारी पेठ उमरेड ता.उमरेड जि. नागपूर ६) केवलराम देवाजी दिघोरे वय ४८ वर्ष रा. तारणा ता. हुही जि. नागपूर ७) सुरेश पांडुरंगजी पौनीकर वय ५४ वर्ष रा. ईतवारी पेठ उमरेड ता. उमरेड ८) विनोद श्रावण जाधव वय ३४ वर्ष रा. मांडवा लभान ता. भिवापूर जि. नागपूर ९) उज्वल हंसराज मोहीनकर वय ३० वर्षे रा. कावरापेठ ता.उमरेड जि. नागपूर** यांचे ताब्यातून मोहाफुल गावठी दारू ४५ लिटर किंमती २५००/—रू. तसेच देशी दारूच्या १८० एम एल च्या एकुण ६१ निपा किमती ४२७०/—रू. ०१ मोटरसायकल किंमती ४०,०००/—रू. असा एकुण एकुण ४६,७७०/—रू. चा दारुसाठा जप्त केला आहे. आरोपीतांविरूद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायदा अन्वये ०९ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ, मा श्री राजा पवार, उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग यांचे मार्गदर्शनात श्री अनिल राउत ठाणेदार व उमरेड पोलीस ठाणे येथील अधिकारी व अंमलदार यांनी केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर